# माने अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम विभागातर्फे “एम्बेडेड टेक्नोलॉजी” वर कार्यशाळा संपन्न!!




1) कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रोलिफिक सिस्टिम्सचे तज्ञ व तृतीय वर्षाचे विद्यार्थी




२) “एम्बेडेड टेक्नोलॉजी” या कार्यशाळेत प्रात्यक्षिक करताना इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम विभागाचे विद्यार्थी

आंबव येथील प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम विभागातर्फे "एम्बेडेड टेक्नोलॉजी" या विषयांतर्गत नुकतीच चार दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली.हि कार्यशाळा तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली व त्याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.तृतीय वर्षाच्या एकूण ५० विद्यार्थ्यांनी सदर कार्यशाळेचा लाभ घेतला.

या कार्याशाळेला श्री.राजेश रागासे व श्री.आनंद राउत (प्रॉलिफिक सिस्टिम्स अँड टेक्नोलॉजीस् प्रा.लि.,पुणे) या तज्ञांचे मार्गदर्शन लाभले.हि कार्यशाळा एम्बेडेड टेक्नोलॉजी विषयाचे सखोल ज्ञान,त्याची व्याप्ती विद्यार्थ्यांना समजावी तसेच त्याविषयीच्या कौशल्याची वृद्धी व्हावी या उद्देशाने आयोजित केली होती.अशा कोर्सेसना भारत सरकारच्या 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची' मान्यता आहे.महाविद्यालयाने याच कारणास्तव प्रोलिफिक सिस्टिम्स अँड टेक्नोलॉजीस् प्रा.लि.,पुणे यांच्याशी सामंजस्य करार केला आहे.

या कार्याशाळेमध्ये मायक्रोकन्ट्रोलर व आर्म प्रोसेसर यांच्या 'एम्बेडेडसी' आणि 'असेम्ब्ली' भाषांमधून प्रोग्रॅमिंगद्वारे प्रात्यक्षिक करण्यावर भर देण्यात आला.किल आयडीइ,फ्लॅश मॅजिक या सॉफ्टवेअर माध्यमांचा उपयोग विद्यार्थ्यांनी केला.त्यामुळे या साधनांचा प्रत्यक्ष वापर करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.मायक्रोकन्ट्रोलरच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी मोटर ड्राईव्हर,एल सी डी डिस्प्ले,कीपॅड इ.उपकरणांवर नियंत्रण कसे करावे याचे प्रात्यक्षिक केले.

कार्यशाळेचा उद्देश विभागप्रमुख प्रा.अजित तातुगडे यांनी विषद केला. नवीन तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते.अशा कार्यशाळांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा व आपले कौशल्य वाढवावे अशी प्रतिक्रिया या कार्यक्रमासंदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश भागवत यांनी व्यक्त केली. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी कार्यशाळा समन्वयक प्रा.महेश पावसकर,विभागप्रमुख प्रा.अजित तातुगडे व अन्य शिक्षकेतर कर्मचा-यांनी विशेष मेहनत घेतली.